भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.२९६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/०४/२०१७

१) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून मिळुन गुन्हा नोंद:—

दिनांक २७/०४/०१७ चे १०.०० ते वा. दर. यातील आरोपीने चालकाने आपले ताब्यातील वाहन आमरोड वर सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने पो.स्टे. सिहोरा येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कळव पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

२) जबरीने पळवुन नेल्याने ,भांडन शिवीगाळ,व धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २७/०४/२०१७ चे ११.३० वा. दरम्यान यातील आरोपी पिडीताचा मोठा भाऊ याने फिर्यादी याचे सोबत तुम्ही लग्न का केले या कारणावरून फिर्यादीला मारपीट करून तुला पाहुन घेवु अशी धमकी देवुन फिर्यादीचे परवानगी शिवाय त्याच्या पत्नीला जबरीने पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६५,३२३,५०४,५०६,,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

३) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे पायी जाणाऱ्या ईसमास धडक मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २५/०४/२०१७ चे ०९.२० वा दरम्यान यातील फिर्यादी हा आपले मित्रा सोबत लग्न मंडपात जेवन करून पायी घराकडे रोडाने जात असता मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी मोटार सायकल चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीला धडक देवुन त्यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी रजत रामु काळे वय २४ वर्ष रा. लावेश्वर हमु. बेला टोली दवडीपार रोड यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भांदवि. सहकलम १३४,१८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पो. स्टे. भंडारा हे करीत आहे.

४) काठीने व खालीबाटलने कनपटीवर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २७/०४/२०१७ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा हनुमान तलाव शिवाजी नगर तुमसर येथील तलावाचे पाण्यात पौना वनस्पतीची जडी काढण्यास गेला असतांना आरोपीने फिर्यादीला तु पाण्याच्या बाहेर निघ असे म्हणुन फिर्यादी हा बाहेर निघाल्यावर आरापीने काठीने व बियरची खाली बॉटलने डावे कानाचे खाली कनपटीवर मारून जखमी केल्याने फिर्यादी राजाराम शिवमुनी राजघरे वय ५५ वर्ष रा. शिवाजी नगर तुमसर यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

५) हृदयविकाराचा झटका आल्याने औषधोपचारा दरम्यान मृत्यु . :—

दिनांक २६/०४/२०१७ चे ०९.२० वा दरम्यान यातील मृतक शरद अंताराम शेंडे वय ५० वर्ष रा. करडी यास हृदयविकाराचा झटका आल्याने त्यास औषधेपचारा करिता ग्रा. रूग्नालय मोहाडी येथे नेले असता तेथील डॉक्टरने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो वरून पोस्टे. मोहाडी येथे मर्ग क्र. ००/२०१७ कलम १७४ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने पोस्टे. करडी ला सरतर्फे फिर्यादी पोना. पठाण यांचे रिपोर्ट कलम १७४ जाफौ. चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटरे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहे

६) नदीचे खोल पात्रात बुडाल्याने ईसमाचा मृत्यु . :–

दिनांक २६/०४/२०१७ चे १६.०० वा. पासुन ते २७/०४/२०१७ चे १६.०० वा दरम्यान यातील मृतक अंबुलाल संबा मरसस्कोल्हे वय ३० वर्ष रा. सयामपुर हमेशा जिल्हा बालाघाट हा आपले साथीदार गडीराम ऊईके, दयाराम कोडवते, रविंद्र ऊईके यांचे सोबत नदीचे पात्र पार करून काळयाच्या मोऱ्या आणण्याकरिता गेला होता की त्याच नदीचे पात्रातुन परत येत असता नदीचे खोल पाण्यात बुडुन मरण पावलयाने फिर्यादी मनोहर बिरजु मरसकाल्हे वय ६२ वर्ष रा. सयामपुर हमेशा जिल्हा बालाघाट यांचे तोंडी रिपोर्ट वरून कलम १७४ जाफौ. चा मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहे

७) दारू, विष प्राषन केल्याने औषधोपचारा दरम्यान ईसमाचा मृत्यु :–

दिनांक २६/०४/२०१७ चे २२.४५ वा दरम्यान यातील मृतक सचीन अनमोल बन्सोडे वय ३५ वर्ष रा. आंबेडकर वार्ड भंडारा याने दारू तसेचे ओपी पॉयझनींग प्राषन केल्याने त्यास औषधेपचारा करिता सा.रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरमयाने मरणे पावल्याने डॉक्टरी मेमो वरून सरमर्फे फिर्यादी पोहवा फुंडे यांचे रिपोर्ट वरून कलम १७४ जाफौ. चा मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे

८) क्षल्लक कारणावरून भांडन, शिवीगाळ, काठीने डोक्यावर मारून जखमी करून,धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २६/०४/२०१७ चे २२.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीची शेत जमिन पळसगाव शेत शिवारात असुन फिर्यादी हो आपले शेतातील उन्हाळी धान पिकाकरिता पाणी देण्याकरिता शेतात हजर असतांना यातील आरोपीने फिर्यादीस माझा काचेचा ग्लास व पाण्याची बॉटल कोणी नेली म्हणुन भांडन शिवीगाळ करून काठीने फिर्यादीचे उजवे पायाचे टोंगळयावर, डावे हाताचे खांदयावर, डावे कानावर व कपाडावर, डावे बाजुस मारून जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी जयराम मारोती सेलोकर वय ६२ वर्ष रा. खुनारी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २७/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन १६९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४, तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

APE 28-4-

(सपोनि. श्री. हत्तीमारे सा.)
जिवीशा. कार्यालय भंडारा
दुरध्वनी ८६६८६९५६३५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.